**सामाजिक सुरक्षा संहिता, २०२० च्या अनुषंगाने महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई अंतर्गत नोंदित जिवीत (सक्रिय) बांधकाम कामगारांना "मृत्यू सहाय्य व दिव्यांग सहाय्य योजना" लागू करण्याबाबत.**

# महाराष्ट्र शासन

**उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग**

**शासन निर्णय क्रमांक: इबांका-०५२६/प्र.क्र.७१(I)/काम-७**

मंत्रालय, हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा रोड,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक : १३ जुलै, २०२६

**वाचा-**

१. इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार विनियमन व सेवाशर्थी) अधिनियम, १९९६
२. इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण उपकर अधिनियम, १९९६
३. महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार विनियमन व सेवाशर्ती) नियम, २००७
४. उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग, अधिसूचना क्र.इबांका-०५२३/प्र.क्र.७६/कामगार-७, दिनांक ३०.११.२०२३
५. केंद्र शासनामार्फत निर्गमित सामाजिक सुरक्षा संहिता, २०२० दिनांक २१.११.२०२५
६. सामाजिक सुरक्षा संहिता (केंद्रीय) नियम, २०२५ दिनांक ३०.१२.२०२५
७. महाराष्ट्र सामाजिक सुरक्षा संहिता नियम, २०२६ (मसूदा) दिनांक ०५.०५.२०२६
८. महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ बैठकीतील ठराव क्र.६५(१-११)/२०२६, दिनांक १२.०५.२०२६
९. महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ कार्यालयाचे पत्र जा.क्र.१२३४/२०२६/कायदा-२०२६/प्र.क्र.१३/मंडळ-०१, दिनांक १९.०५.२०२६

**प्रस्तावना :-**

इमारत व इतर बांधकाम क्षेत्रात काम करणाऱ्या कामगारांच्या रोजगाराचे व सेवाशर्तीचे नियमन करण्यासाठी तसेच बांधकाम कामगारांची सुरक्षा, आरोग्य आणि त्यांच्याकरीता कल्याणकारी उपाययोजना करण्यासाठी केंद्र शासनाने इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार विनियमन व सेवाशर्ती) अधिनियम, १९९६ लागू केला होता. त्यास अनुसरुन इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार विनियमन व सेवाशर्ती) अधिनियम, १९९६ च्या अंमलबजावणीसाठी महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार विनियमन व सेवाशर्ती) नियम, २००७ तयार करण्यात आले. सदर अधिनियमाच्या कलम १८ अन्वये राज्यात महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाची स्थापना करण्यात आली आहे.

इमारत व इतर बांधकाम कामगार उपकर अधिनियम, १९९६ च्या कलम ३ (१) नुसार केंद्र शासनाने दिनांक २६.०६.१९९६ च्या अधिसूचनेद्वारे एकुण प्रकल्प खर्चाच्या १% (जमिनीचे मूल्य वगळता) इतका उपकर निश्चित केला आहे. त्यानुसार राज्यातील इमारत व इतर बांधकाम क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या कामगारांची

मंडळामार्फत नोंदणी व नुतनीकरण करण्यात येऊन मंडळाकडे जमा होणाऱ्या उपकराच्या निधीमधून मंडळामार्फत नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगारांकरीता विविध कल्याणकरी योजना राबविल्या जात आहेत.

केंद्र शासनाने २९ कामगार कायदे निरसित करुन चार नवीन कामगार संहितांची (Labour Codes) दिनांक २१ नोव्हेंबर, २०२५ पासून संपूर्ण देशात अंमलबजावणी सुरु केली आहे. त्याअंतर्गत संदर्भिय क्र.१ व २ येथील अधिनियम निरसित करण्यात आले असून आता इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणाशी संबंधित बाबींचा समावेश "सामाजिक सुरक्षा संहिता-२०२०" मध्ये करण्यात आला आहे.

सदर संहितेच्या कलम (७) (६) मध्ये बांधकाम कामगारांना कोणत्या बाबीकरीता विविध कल्याणकारीयोजना राबविणे आवश्यक आहे, याबाबतच्या तरतूदी स्पष्ट करण्यात आल्या आहेत. यानुसार कलम (७) (६) (a) मध्ये "provide death and disability benefits to a beneficiary or his dependants" अशी तरतूद नमूद केली आहे.

या तरतुदीस अनुसरुन मंडळाने दिनांक १२.०५.२०२६ रोजीच्या बैठकीत ठराव पारीत करुन संदर्भिय क्र.९ अन्वये मंडळांतर्गत नोंदित जिवीत (सक्रिय) बांधकाम कामगारांना नव्याने मृत्यू सहाय्य व दिव्यांग सहाय्य योजना लागू करण्याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर केला आहे. बांधकाम कामगार हा जोखमीच्या ठिकाणी काम करत असतो, अशा बांधकामाच्या ठिकाणी होणाऱ्या अपघातामध्ये त्यांना मृत्यू अथवा दिव्यांगत्व येते. अशावेळी त्यांना व त्यांच्या अवलंबित्वांना सहाय्य करण्याकरीता यापूर्वी मंडळामार्फत नोंदीत बांधकाम कामगारांसाठी सुरु असलेली योजना रद्द करुन सामाजिक सुरक्षा संहितेमधील नमूद तरतुदीनुसार सुधारित **"मृत्यू सहाय्य व दिव्यांग सहाय्य योजना"** लागू करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई अंतर्गत मृत्यू सहाय्याकरीता सुरू असलेल्या (अंत्यविधी सहाय्य-रक्कम रू.१०,०००/ एकवेळ (F-06), वारस सहाय्य-रू.२४,०००/- प्रतिवर्ष पाच वर्षाकरीता (F-07) व शववाहीनी-प्रत्यक्ष होणारा खर्च (F-08) योजना तसेच, दिव्यांगाकरीता सुरू असलेली कृत्रिम अंग लावणे-प्रत्यक्ष होणारा खर्च (H-07) ह्या योजना बंद करून, नोंदित जिवीत (सक्रिय) बांधकाम कामगारांना सुधारित **"मृत्यू सहाय्य व दिव्यांग सहाय्य योजना"** लागू करण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

त्यानुसार सदरहू योजनेअंतर्गत नैसर्गिक मृत्यू सहाय्य योजना, अपघाती मृत्यू सहाय्य योजना, दिव्यांग सहाय्य योजना या तीन बाबींचा समावेश असून त्याकरीता योजनेचे नाव, पात्रता निकष, वित्तीय सहाय्य आणि आवश्यक कागदपत्रे याबाबतचा गोषवारा यासोबतच्या **"प्रपत्र-अ"** मध्ये नमूद केला आहे.

२. महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई यांच्याकडे जमा होणाऱ्या उपकरामधून या योजनेवर होणारा खर्च भागविण्यात यावा.

३. अर्जदाराने खोटी माहिती दिल्यास त्यांना देय होणाऱ्या लाभाची वसूली करुन सदर कामगाराची नोंदणी रद्द करण्यात येईल. तसेच सदरहू कामगार फौजदारी कार्यवाहीस पात्र ठरेल.

४. सामाजिक सुरक्षा संहिता, २०२० नुसार वरीलप्रमाणे मंडळांतर्गत नोंदणीकृत बांधकाम कामगारांकरीता सुधारित केलेल्या मृत्यू व दिव्यांग सहाय्य योजनांबाबत मंडळाच्या संगणकीय प्रणालीमध्ये या शासन निर्णयातील तरतुदींनुसार आवश्यकतेप्रमाणे बदल करण्यात यावेत.

५. सदरची योजना महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई मार्फत राबविण्यात येईल. सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी योजना अंमलबजावणीबाबत आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६०७१३१२५३१८३११० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

DEEPAK UTTAMRAO POKALE

Digitally signed by DEEPAK UTTAMRAO POKALE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=IELMD, 2.5.4.20=856B31C793B12E4F22CB247C5CFF7F3358867F2482AA2234F6131BF8940DBD2E, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=F4163205E7B4960CC7CA6F973D6DEB06502B2E8FC47A411BABCF42A0E99CF34B, cn=DEEPAK UTTAMRAO POKALE
Date: 2026.07.13 12:54:20 +05'30'

**(दिपक पोकळे)**
**उपसचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत:-**

१. मा.राज्यपाल, महाराष्ट्र राज्य, यांचे सचिव राजभवन, मुंबई
२. मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, विधानमंडळ, मुंबई
३. मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, विधानमंडळ, मुंबई
४. मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
५. मा. उप मुख्यमंत्री (नगर विकास), मंत्रालय, मुंबई
६. मा. उप मुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क, क्रिडा व अल्पसंख्याक), मंत्रालय, मुंबई
७. मा. मंत्री (कामगार) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
८. सर्व मा.मंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
९. मा. राज्यमंत्री (कामगार) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
१०. सर्व मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
११. सर्व मा. विधानपरिषद सदस्य
१२. सर्व मा. विधानसभा सदस्य
१३. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, यांचे सचिव राजभवन, मुंबई
१४. सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,मंत्रालयीन विभाग, मंत्रालय,मुंबई
१५. प्रधान सचिव (कामगार) यांचे स्वीय सहायक, उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग, मुंबई.
१६. प्रधान सचिव, विधानमंडळ, मुंबई
१७. कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य
१८. सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई.
१९. निवड नस्ती

# **“प्रपत्र-अ”**

| अ.क्र. | योजनेचे नाव | पात्रता निकष | वित्तीय सहाय्य | आवश्यक कागदपत्रे |
|---|---|---|---|---|
| १ | नैसर्गिक मृत्यू सहाय्य योजना | ➢ ज्या बांधकाम कामगारांची नोंदणी जिवीत (सक्रिय) आहे, असे बांधकाम कामगार या योजनेकरीता पात्र राहतील.<br>➢ बांधकाम कामगार किमान तीन वर्षे मंडळाकडे नोंदीत असणे आवश्यक राहील. याबाबत स्पष्ट करण्यात येते की, बांधकाम कामगाराच्या नोंदणीचे दोन वर्षे पुर्ण झाली असतील व तिसऱ्या नोंदणी वर्षामध्ये मृत्यू झाल्यास सदरचा बांधकाम कामगार पात्र राहील. तसेच, तिसऱ्या वर्षाकरीता नोंदणीकरीता अर्ज सादर केला असेल व सदर अर्जावरील अंतिम निर्णयापूर्वीच मृत्यू झाल्यास सदरचा बांधकाम कामगार पात्र राहील. तीन वर्षे नोंदणीचा कालावधी गृहीत धरताना कोणत्याही वर्षाची नोंदणी गृहीत धरण्यात येईल, याकरीता सलग तीन वर्षे नोंदणी असण्याची आवश्यकता राहणार नाही.<br>➢ बांधकाम कामगाराचा मृत्यू झाल्यानंतर एक वर्षाच्या आतमध्ये त्याच्या वारसदाराने अर्ज सादर करणे आवश्यक राहील अन्यथा मयत बांधकाम कामगाराच्या वारसदारास या योजनेच्या लाभ अनुज्ञेय राहणार नाही.<br>➢ सदर योजनेंतर्गत उचित प्राधिकरणाकडून वारस प्रमाणपत्र प्राप्त करून घेणे आवश्यक राहील. | सदर योजनेअंतर्गत रक्कम रू.३,५०,०००/- इतके एकवेळचे सहाय्य म्हणून देण्यात येईल. | (i) बांधकाम कामगाराचे मृत्यू प्रमाणपत्र<br>(ii) वारस प्रमाणपत्र<br>(iii) वारसदाराचे आधारकार्ड<br>(iv) वारसदारांच्या बँक खात्याचा तपशिल |

कृ.मा.प.

| अ.क्र. | योजनेचे नाव | पात्रता निकष | वित्तीय सहाय्य | आवश्यक कागदपत्रे |
|---|---|---|---|---|
| २ | अपघाती मृत्यू सहाय्य योजना | ➢ ज्या बांधकाम कामगारांची नोंदणी जिवीत (सक्रिय) आहे, असे बांधकाम कामगार या योजनेकरीता पात्र राहतील.<br>➢ बांधकाम कामगाराने नोंदणीकरीता अर्ज सादर केला असेल व सदर अर्जावरील अंतिम निर्णयापूर्वीच अपघाती मृत्यू झाल्यास सदरचा बांधकाम कामगार पात्र राहील.<br>➢ ज्या ठिकाणी इमारत व इतर बांधकाम सुरू असताना अशा ठिकाणी अपघाताद्वारे झालेल्या मृत्यू करीता सदरची योजना लागू राहील.<br>➢ बांधकाम कामगाराचा मृत्यू झाल्यानंतर एक वर्षाच्या आतमध्ये त्याच्या वारसदाराने अर्ज सादर करणे आवश्यक राहील अन्यथा मयत बांधकाम कामगाराच्या वारसदारास या योजनेच्या लाभ अनुज्ञेय राहणार नाही.<br>➢ सदर योजनेंतर्गत उचित प्राधिकरणाकडून वारस प्रमाणपत्र प्राप्त करून घेणे आवश्यक राहील. | सदर योजनेअंतर्गत रक्कम रू.६,५०,०००/- इतके एकवेळचे सहाय्य म्हणून देण्यात येईल. | (i) पोलिस प्रथम खबरी अहवाल व पंचनामा<br>(ii) बांधकाम कामगाराचे मृत्यू प्रमाणपत्र<br>(iii) वारस प्रमाणपत्र<br>(iv) वारसदाराचे आधारकार्ड<br>(v) वारसदारांच्या बँक खात्याचा तपशिल |

कृ.मा.प.

| अ.क्र. | योजनेचे नाव | पात्रता निकष | वित्तीय सहाय्य | आवश्यक कागदपत्रे |
|---|---|---|---|---|
| ३ | दिव्यांग सहाय्य योजना | ➢ ज्या बांधकाम कामगाराने किमान एकवेळ मंडळाकडे नोंदणी केली असेल असे बांधकाम कामगार या योजनेकरीता पात्र राहतील. | सदर योजनेअंतर्गत रक्कम रू.२,००,०००/- इतके एकवेळचे सहाय्य म्हणून देण्यात येईल. | (i) ७५% दिव्यांगत्व असल्याचे जिल्हा शल्यचिकित्सक यांचे प्रमाणपत्र |
| | | ➢ बांधकाम कामगारने नोंदणीकरीता अर्ज सादर केला असेल व सदर अर्जावरील अंतिम निर्णयापूर्वीच त्यास दिव्यांगत्व आल्यास सदरचा बांधकाम कामगार पात्र राहील. | | |
| | | ➢ मंडळाकडील नोंदणीनंतर आलेल्या दिव्यांगत्वासाठी बांधकाम कामगार या योजनेसाठी पात्र राहतील. | | |
| | | ➢ दिव्यांगत्वाचे प्रमाण किमान ७५% असल्यास बांधकाम कामगार या योजनेच्या लाभासाठी पात्र राहतील. | | |
| | | ➢ बांधकाम कामगारास दिव्यांगत्व प्राप्त झाल्यापासून एक वर्षाच्या आतमध्ये अर्ज सादर करणे आवश्यक राहील अन्यथा सदरहु बांधकाम कामगार या योजनेचा लाभ अनुज्ञेय राहणार नाही. | | |

DEEPAK UTTAMRAO POKALE

Digitally signed by DEEPAK UTTAMRAO POKALE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=IELMD, 2.5.4.20=856B31C793B12E4F22CB247C5CFF7F3358867F2482AA2234F6131BF8940DBD2E, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=F4163205E7B4960CC7CA6F973D6DEB06502B2E8FC47A411BABCF42A0E99CF34B, cn=DEEPAK UTTAMRAO POKALE
Date: 2026.07.13 12:55:12 +05'30'

**(दिपक पोकळे)**

**उपसचिव, महाराष्ट्र शासन**